


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १५८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१९ जानेवारी २०२५

## कर्जबाजारीला कंटाळून दोन शेतकऱ्यांच्या आत्महत्या...

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१८, नांदेड :** अतिवृष्टी, रोगराईमुळे शेतातील सततची नापिकी यातून झालेली कर्जबाजारी या विवंचनेतून दि. १७ जानेवारी रोजी अर्धापूर तालुक्यातील दोन शेतकऱ्यांनी विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली. बारसगांव येथील गणेश महाजन आणि अर्धापूर येथील नारायण राऊत अशी मृत शेतकऱ्यांची नावे असून याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात अकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अर्धापूर तालूक्यातील बारसगाव येथील शेतकरी गणेश नामदेव महाजन (वय ४४ वर्षे ) यांची बारसगाव शिवारात शेती असून त्यांनी आपल्या शेतीवर बँकेकडून कर्ज घेतले होते. यातच मागील वर्षी अतिवृष्टीने शेतीचे नुकसान झाले. शेतातील सततची नापिकी यामुळे बँकेचे कर्ज कसे फेडणार ? त्यातच कुंटुबाचा उदनिर्वाह कसा चालवणार ? याच विवंचनेत ते कायम असायचे. त्यांनी आपल्या शेत गट नंबर ३१ मध्ये दि.११ रोजी विषारी द्रव्य प्राशन केले. सदर माहिती कळतात नातेवाईकांनी रुग्णालयात दाखल केले. परंतू उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा मोठा परिवार आहे.

तर अर्धापूर शहरातील गणपतराव देशमुख नगर येथील नारायण गोविंदराव राऊत झाडगावकर (वय ५० वर्षे) यांनी कर्जबाजारीला कंटाळून कुंटुबाचा उदनिर्वाह कसा चालवणार ? याच विवंचनेत आपल्या शेतात गट नंबर १९० मध्ये विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## अतिक्रमण विभागामार्फत बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई केली.

१) आदेश वाघमारे, घर क्र.४०४, सेक्टर-२०, बेलापूर गांव, २) महेश मोतीराम कुंभार, घर क्र.७०६ सेक्टर-१९, शहाबाज गांव, बेलापूर ३) प्रशांत जोशी, घर क्र.५९४, सेक्टर-२०, बेलापूर, ४) नान्हे अब्दुल अन्सारी, घर क्र.०५७४, सेक्टर- १९/बी, फणसपाडा बेलापूर ५) मधुकर चंदर म्हात्रे व इतर, भु.क्र.बी-३३५ व बी- ३३६, सेक्टर- २०, बेलापूर, नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकामास ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

तसेच त्याअनुषंगाने संबधितांनी वरील, केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन बेलापूर येथील एमआरटीपी कलम ५४ अन्वये नोटीसा बजाविण्यात आलेल्या ०५ अनधिकृत बांधकामांवर नमुंमपा व सिडको कडील अधिकारी/ कर्मचारी यांचे संयुक्तपणे निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

या धडक मोहिमेसाठी डॉ.अमोल पालवे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी- बेलापूर, यांचे नियंत्रणाखाली तसेच आत्माराम काळे, कनिष्ठ अभियंता व रमेश राठोड, प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या कारवाई करीता उपस्थित होते.

## घातक शस्त्र बाळगणारा इसम पिस्टल व ४ जिवंत काडतुसासह ताब्यात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, भोकरदन (जालना) :** भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलिसाची कारवाई ऐका इसमास पिस्टल व चार कडतुसासह ताब्यात घेण्यात आले दिनांक.१७ रोजी एकाकडे घातक शस्त्र असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली असता.

तळेगाव फाटयाचे जवळ हसनाबाद ते विल्हाडी रोडवर एकाकडे घातक शस्त्र असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहीती मिळाल्याने तळेगाव फाट्याजवळ वेंदात बिअर बार समोर रोडवर सापळा लावुन एक इसम संशयीत रित्या वावरतांना दिसुन आला व त्याचेकडे काहीतरी घातक शस्त्र असल्याचे संशय आल्याने त्यास प्रथम आहे त्या स्थितीत ताब्यात घेऊन त्यास सदर पंचासमक्ष ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव बादल संतोष चव्हाण वय २० वर्ष रा.पारधी वस्ती हसनाबाद, ता. भोकरदन जि. जालना असे सांगितले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला पँटच्या आतुन खालील नमुद वर्णनाचे अग्री शस्त्र गावठी पिस्टल मिळुन आली त्याचे वर्णन. १) ८,०००/ एक गावठी बनावटीचे लोखंडी बाँडी असलेले व मुठीला प्लॅस्टीकचे दोन्ही बाजुने आवरण असलेले अग्रीशस्त्र पिस्टल व मॅग्झीनमध्ये ४ जिवंत काडतुस ज्याचे कॅपवर घक्र ७.६५ असे इंग्रजीत लिहलेले जुनी वापरती कि.अं. सदरची कारवाई मा. अजय कुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक सो, मा. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक सो, मा.डॉ. गणपत दराडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन यांचे मार्गदर्शनाखाली संजय आहिरे सहा. पोलीस निरीक्षक हसनाबाद पो.स्टे., फकरीचंद फडे पोउपनि हसनाबाद, पोहेकॉ/१२५५ सागर देवकर, पोकॉ/१३४९ निलेश खराट, पोकॉ/१६३० नितेश खरात, पोकॉ/२२३ दिपक सोनुने, पोकॉ/१६४५ सुरेश डुकरे, पोकॉ/१६६९ विनोद भिवसने यांनी केलेली आहे.

# लोकल, बस, मेट्रो अन् मोनोसाठी सरकारचा मोठा निर्णय



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, मुंबई :** मुंबई लोकल, बेस्ट बस, मेट्रो आणि मोनोरेल हे मुंबईच्या वाहतुकीची प्रमुख साधने आहेत. या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याकरता तिकीट काढणे अनिवार्य असते.

मुंबई लोकल, मेट्रो आणि मोनोरेलच्या तिकिट काऊंटवरील गर्दी अन् बेस्ट बसमध्ये सुट्ट्या पैशांवरून होणारे वाद रोखण्याकरता आता सरकार एकच अॅप तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. या एकाच अॅपवरून मुंबईकर तिकिट काढू शकणार आहेत. यासंदर्भातल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली 'इंटीग्रेशन ऑफ तिकिटिंग सर्विसेस' संदर्भात बैठक झाली. या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाच्या अधिकृत एक्स खात्यावरून यासंदर्भात माहिती देण्यात आली. फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस मुंबईतील दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. शहरी वाहतुकीसाठी समर्पित असे सिंगल प्लॅटफॉर्म अॅपचा आज आढावा घेण्यात आला. या एकाच सिंगल अॅपवर मेट्रो, मोनोरेल, बेस्ट बस तसेच उपनगरीय रेल्वे (लोकल रेल्वे) जी मुंबई शहराची लाईफलाइन म्हणून ओळखली जाते, ती देखील यावर उपलब्ध असेल. या एकच अॅपद्वारे प्रवासी आपली यात्रा व्यवस्थितपणे प्लॅन करू शकतात. सार्वजनिक वाहतूक प्रणाली एका सिंगल मोबिलिटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असून, त्यादृष्टीने मुंबईतील पायाभूत सुविधा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. या अॅपद्वारे प्रवास करणाऱ्या व्यक्तीला आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे त्याच्या जवळ असणारे स्टेशन किंवा कोणती सार्वजनिक वाहतूक व्यवस्था त्याच्या जवळ आहे, हे कळू शकेल. तसेच वाहतुकीचे सुलभीकरण होऊन प्रवाशांचा मोठा वेळ यामुळे वाचणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून टॅक्सी आणि इतर सेवांसोबत या प्रणालीचे एकत्रिकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले. तसेच लवकरच हे अॅप प्रवाशांच्या सेवेसाठी लॉन्च करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**महाराष्ट्रात रेल्वे प्रकल्पांसाठी १ लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात बोलताना सांगितले की, मुंबईत सध्या साडेतीन हजार लोकल सेवा कार्यरत आहेत. येत्या काळात आणखी ३०० लोकल सेवा सुरू करण्यासाठी १७ हजार १०७ कोटींची गुंतवणूक रेल्वेकडून करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये १ लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकार मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध असल्याचे, त्यांनी याप्रंसंगी स्पष्ट केले.

## आदिवासी समाजाचा विराट आक्रोश मोर्चा




**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.१८, किनवट (नांदेड) :** आदिवासी महिलेवर १३ जानेवारी झालेल्या संघटित अत्याचार प्रकरणाची दखल सामाजिक स्तरावर गंभीरतेने घेण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर १८ जानेवारी रोजी आदिवासी समाजाचा विराट आक्रोश मोर्चा काढण्यात आला. नारी पर अत्याचार मानवता शर्मसार च्या तत्वधानाने कुठेतरी भविष्यात आळा बसावा याच उद्देशाने दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी १३ जानेवारीला घडलेल्या आदिवासी महिलेवरल संघटित अत्याचार घटनेच्या निषेधार्थ विराट आक्रोश मोर्चा किनवट शहरातील हुतात्मा गोंड राजे शंकरशहा रघुनाथशहा विचार मंचापासून मोर्चाची सुरुवात आणि शहराच्या प्रमुख मार्गाने सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन त्यांना लोकभावनेचे निवेदन देण्यात आले.

एका आदिवासी महिलेला नोकरीची फुस लावून कंधार तालुक्यातील रहिवासी परंतु आरोग्य सेवक या हुद्द्यावर बोधडी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सेवेत असलेल्या विठ्ठल मुंडे नावाचा नराधमाने खरबी जंगलात नेऊन अत्याचार केला. महिला एकटी असल्याचे पाहून दराटीतील प्रफुल उत्तम झंजाळकर, अब्दुल अजीज मसूद पठाण आणि शाहरुख मिर्झा कुरेशी या नराधमांनीतर त्या ठिकाणाहून पुन्हा जंगलात नेऊन अत्याचार करून मानवतेला शर्मसार करण्याचा प्रकार केल्याने या चारही नराधमांना कठोरातील कठोर आणि फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी जय घोष करत जल्लोषात आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

## शिर्डीचे राष्ट्रीय अधिवेशन दिशा देणारे ठरेल : आ.दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात महायुतीचे चांगले वातावरण निर्माण झाले असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत महायुतीची सत्ता यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी कटिबद्ध होत आतापासूनच नियोजन करावे. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढावी, संघटन वाढावे यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. शिर्डी येथे होणारे राष्ट्रीय अधिवेशन हे पक्ष विस्तारासाठी नवी दिशा देणारे ठरेल. असे प्रतिपादन पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले. अहिल्यानगर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाची जिल्हा बैठक आमदार संग्राम जगताप यांच्या संपर्क कार्यालयात माजी आमदार अरुण जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पक्षाचे आमदार संग्राम जगताप व आमदार काशिनाथ दाते यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, प्रदेश युवतीचे अध्यक्षा संध्या सोनवणे, राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा, जिल्हा कार्यालयीन सचिव साईनाथ भगत, जिल्हा उपाध्यक्ष भीमराव फुंदे, शहा नवाज खान व अशोक जायभाय, जिल्हा युवक अध्यक्ष नंदकुमार मुंडे, संजय कोळगे, जिल्हा सचिव अजित कदम, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शिर्डी येथे १८ व १९ जानेवारीला राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. त्याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले होते. माजी आमदार अरुण जगताप म्हणाले विधानसभा निवडणुकीत सर्वांनी एकत्रित काम केल्याने जिल्ह्यात व राज्यात मोठे परिवर्तन झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकार्यांनी काम करून पक्ष वाढीसाठी योगदान द्यावे. जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांना आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी भारताचा संघ जाहीर!

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील १५ सदस्यीय भारतीय संघ जाहीर केला आहे. हाच संघ इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार आहे. या संघाच्या उपकर्णधारपदी युवा खेळाडू शुबमन गिलची वर्णी लागली आहे. त्याचबरोबर इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान जसप्रीत बुमराह खेळणार नसल्याने त्याच्या जागी हर्षित राणा खेळणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात काही बदल करण्यात आले आहेत. ज्यामध्ये मोहम्मद शमी खूप दिवसांनी पुनरागमन झाले आहे. तो २०२४ च्या विश्वचषकानंतरपासून दुखापतीमुळे संघातून बाहेर होता. विशेष म्हणजे यशस्वी जैस्वाला पहिल्यादांच वनडे संघात स्था मिळालं आहे. यावेळी चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तान आणि दुबईमध्ये हायब्रीड मॉडेल अंतर्गत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना १९ फेब्रुवारीला यजमान पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात कराची येथे होणार आहे. तर भारतीय संघ बांगलादेशविरुद्ध २० फेब्रुवारी रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पहिला सामना खेळणार आहे.

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी भारताचा १५ सदस्यीय संघ –**

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक



पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा.

**भारताचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील संपूर्ण वेळापत्रक –**

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील आपल्या मोहिमेची सुरुवात बांगलादेशविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. उभय संघांमधील सामना २० फेब्रुवारी रोजी दुबईत होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात २३ फेब्रुवारीला सामना होणार आहे. टीम इंडिया २ मार्चला न्यूझीलंडशी भिडणार आहे. जर भारताने गट सामन्यांमध्ये अव्वल स्थान कायम राखले आणि पुढील फेरीत प्रवेश केला तर ४ मार्च रोजी उपांत्य फेरीचा सामना खेळेल. या स्पर्धेचा अंतिम सामना ९ मार्च रोजी होणार आहे.

**भारताचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील सामने –**

२० फेब्रुवारी: भारत विरुद्ध बांगलादेश, दुबई
२३ फेब्रुवारी: भारत विरुद्ध पाकिस्तान, दुबई
२ मार्च: भारत विरुद्ध न्यूझीलंड, दुबई
४ मार्च: उपांत्य फेरी (पात्र ठरल्यास), दुबई
९ मार्च: अंतिम (पात्र असल्यास), दुबई

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे स्वरुप**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये ८ संघांमध्ये एकूण १५ सामने होणार आहेत. संघांची २ गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गट-अ मध्ये आहेत. त्यांच्यासह उर्वरित दोन संघ न्यूझीलंड आणि बांगलादेश आहेत. तर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान आणि इंग्लंड यांना ब गटात ठेवण्यात आले आहे. सर्व ८ संघ आपापल्या गटात ३-३ सामने खेळतील. यानंतर, प्रत्येक गटातील टॉप-२ संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. पहिला उपांत्य सामना दुबईत, तर दुसरा लाहोरमध्ये होणार आहे. यानंतर अंतिम सामना खेळवला जाईल. अशा परिस्थितीत एखादा संघ अंतिम फेरीत पोहोचला तर तो स्पर्धेत एकूण ५ सामने खेळेल.

# संपादकीय



## चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला.

कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. मागील वर्षी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीन भारताच्या खोड्या बंद करत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे यावेळी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. पंधरा दिवसापूर्वीच भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला आहे. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने आता भारताशी वॉटर वार सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. मागील वर्षी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे.

चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने अवलंबले आहे.

# दारू पिणाऱ्यांना मुलगी देऊ नका !



सध्या एक व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. मारवाडी कुटुंबातील या लग्नाच्या व्हिडिओमध्ये नवरदेव लग्नात दारू पिऊन आला म्हणून नवरीची आई मुलीचे लग्न मोडताना दिसत आहे. दारुड्या मुलाच्या हातात मी माझ्या मुलीचा हात देणार नाही असे उपस्थितांना विनंती करून सांगताना ती माउली दिसत आहे. जो मुलगा स्वतःच्या लग्नातही दारू ढोसून धिंगाणा करू शकतो तो आपल्या लेकीला आयुष्यभर कशा स्थितीत ठेवील याची कल्पनाच या माउलीला आल्याने तीने हा ठोस निर्णय घेतला. नवरदेवाचे नातेवाईक लग्न मोडू नये यासाठी विनवणी करतानाही दिसत आहेत; मात्र महिला आपल्या निर्णयावर ठाम राहून मुलीचे लग्न मोडताना या व्हिडिओमध्ये दिसत आहे. मारवाडी समाजाचे लग्न म्हणजे प्रचंड खर्च, नातेवाईक आणि वऱ्हाडी मंडळींची मोठ्या प्रमाणात रेलचेल. लग्न मोडल्याने हे सर्व वाया जाणार, नातेवाईकांत चर्चा होणार; मात्र या सर्वांचा तिळमात्र विचार न करता केवळ मुलीच्या भवितव्यासाठी या सर्वांवर पाणी फेरणाऱ्या माउलीचे नेटकरी मोठ्या प्रमाणात कौतुक करताना दिसत आहेत.

दारूच्या व्यसनाने आजतागायत अनेकांचे संसार उध्वस्त केले आहेत, अनेकांना कर्जबाजारी केले आहे, तर अनेकांना रस्त्यावर आणले आहे. व्यसनाच्या अधीन झालेल्यांना पत्नी-लेकरे तुच्छ मानायला लावणारी दारू सुखी संसारात विष पेरण्याचे कार्य करते. दारू केवळ तिचे सेवन करणाऱ्याचाच ऱ्हास करत नाही, तर घरातील एका दारुड्यामुळे संपूर्ण कुटुंबाला मानसिक त्रास सहन करावा लागतो, घरातील लहान मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. दारू पिणाऱ्याकडून नशेत अनेकदा धिंगाणा घातला जात असल्याने त्याचा त्रास शेजारपाजाऱ्यांनाही सहन करावा लागतो. मद्यविक्रीतून दरवर्षी राज्यांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने कोणतेही राज्य सरकार आपल्या राज्यात दारूबंदी करण्यास अनुकूल नसते. तरीही दारूमुळे होणारी सामाजिक हानी लक्षात घेऊन बिहार, गुजरात, मिझोराम, नागालँड, मणिपूर आदी राज्यांत तर काही राज्यांतील गावांत आणि तालुक्यांत संपूर्ण दारूबंदी करण्यात आली आहे.

ही दारूबंदी करण्यात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे. घरातील एखादा पुरुष दारू पित असेल तर सर्वाधिक त्रास घरातील स्त्रीला होतो, मग ती स्त्री पत्नी असो, आई असो वा मुलगी असो. आजही अनेक गावांत दारूबंदी करण्यासाठी स्त्रियांनी मोर्चे काढल्याच्या, आंदोलने केल्याच्या बातम्या वाचनात येतात. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्येही एक स्त्री आपल्या मुलीचे भविष्य वाचवण्यासाठी सर्व नातेवाईकांशी आणि समाजाशी लढताना दिसत आहे. ही स्त्री समस्त मातांसाठी आदर्श आहे. दारू पिणाऱ्या मुलाशी मी माझ्या मुलीचे लग्न करणार नाही या निर्णयावर प्रत्येक आईने ठाम राहिल्यास भविष्यात अनेक मुलींचे संसार उध्वस्त होण्यापासून वाचतील. मुलाला कोणते व्यसन आहे का याबाबत प्रत्येक माउली मुलीचे लग्न ठरवण्याआधी मुलाच्या नातेवाईकांना विचारून घेते त्यावेळी अनेकदा मुलाकडून अथवा मुलाच्या नातेवाईकांकडून मुलगा कधीतरी क्वचितच मित्रांसोबत दारू पितो असे सांगितले जाते. मुलाच्या बाबतीत अन्य बाबी चांगल्या आहेत मग कधीतरी दारू पिणे सध्याच्या काळात ठीक आहे असे समजून अनेकदा मुलीचे पालक त्याकडे दुर्लक्ष करतात; मात्र हेच महाभाग पुढे अट्टल बेवडे निघतात आणि एकदा लग्न झाल्यावर सर्वच हाताबाहेर गेलेले असते. अशा घटना आज अनेक ठिकाणी घडताना पाहायला मिळतात. उपरोक्त माउलीप्रमाणे दारू पिणाऱ्या मुलाच्या हातात मी माझ्या मुलीचा हात देणार नाही या निर्णयावर प्रत्येक आईने आणि प्रत्येक पित्याने ठाम राहायचे ठरवले तर येणाऱ्या काळात दारू पिणाऱ्यांचे प्रमाण कमी होण्यास वेळ लागणार नाही. जसे नोकरीधंदा न करणाऱ्याला कोणी आपली मुलगी देत नाही तसे दारू पिणाऱ्याशीही कोणी लग्न करू इच्छित नाही हा संदेश समाजात रुजल्यास तरुणांमधील दारू पिण्याचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने प्लास्टिक विरोधी कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, पनवेल :** गेल्या काही दिवसांपासून आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल खारघर, कळंबोली, कामोठा या चार प्रभागांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये मागील १६ दिवसात सुमारे ४७ किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे ८० हजाराचा दंड वसूल करण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दि.१६ जानेवारी रोजी मोठी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'ब' कळंबोली प्रभागामध्ये प्लास्टिक पिशवी प्रतिबंध (सिंगल युझ प्लास्टिक) कारवाई दरम्यान रु. १० हजार हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला , या कारवाई मध्ये सुमारे ९ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे व कर्मचारी उपस्थित होते. याचबरोबर मागील पंधरा दिवसांमध्ये पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग अ, ब, क, आणि ड मध्ये सातत्याने प्लास्टिक विरोधोत कारवाई केली जात असून यावेळी सुमारे ३८ किलोपेक्षा अधिक सिंगल युज प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला आहे.



पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे. याचबरोबर चारही प्रभागांमधील दुकानदारांना दुकानाबाहेर कचऱ्याचे डबे ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशाचे पालन न करणाऱ्या दुकानादारांवरती देखील दंडात्मक कारवाई करण्यात येत आहेत. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सहाय्यक आयुक्त स्मिता काळे व विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या पर्यवेक्षणाखाली चारही प्रभागांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई तसेच दुकानाबाहेर कचऱ्याचे डबे न ठेवणाऱ्या दुकानदारांवरती दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना जारी केली आहे. तसेच सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री आणि वापरांवर बंदी करण्यात आली आहे.

प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये, तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.

## कागदी पाहुणे..

घरी माझ्या येणारे
लांबडी चौडी यादी
सरता सरेना वर्दळ
सारखी दाटते गर्दी

फ्लिपकार्टअॅमेझॉन
कुणीहीयेतात कधी
दूधवाला पेपरवाला
हजेरीलावतो आधी

घेऊन जाई भरभरू
भंगारपेपर अन् रद्दी
हटकून भेटाया येती
फेरीवाले अतिजिद्दी

रोज हेलपाटे मारती
स्विगी झोमॅटो आदि
स्कीम काढू नवनवी
सततलावतात नादी

ऑनलाईनशॉपींगचे
ओळखीचे रे अगदी
आगंतुक भाव शून्य
व्यवहारअसे कागदी

झाडूवाले कामवाली
रोजची ठरलेली वर्दी
माहीत नाही रे परंतु
पै पाहुणे आले कधी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## २३ वी श्री छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धा २०२४-२५

# पुणे ग्रामीणचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत, आज रंगणार अंतिम थरार





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, बारामती :** महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथील २३ व्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चषक वरिष्ठ पुरूष व महिला गट कबड्डी स्पर्धेत पुरूष विभागात पुणे ग्रामीण, व महिलांमध्ये पुणे ग्रामीण उपांत्य फेरीत दाखल झाला आहे.

रेल्वे मैदानावर सुरू असलेल्या कबड्डी स्पर्धेच्या चौथ्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात पुरूष विभागात बाद फेरीच्या झालेल्या पहिल्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई उपनगर पूर्व संघावर ४०-२० असा दणदणीत विजय मिळवित उपांत्य फेरीत प्रवेश केला. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २३-८ अशी चांगली आघाडी होती. पुणे ग्रामीणच्या जीवन डोंबले, स्वप्नील कोळी व अजित चौहान यांच्या चढायांच्या जोरावर हा विजय सोपा झाला. त्यांना अनुज गावडेने केलेल्या पकडींची चांगली साथ मिळाली. पुणे ग्रामीण संघाने सुरवातीपासुनच सामन्यावर आपली पकड घट्ट केली होती. त्यामुळे मुंबई उपनगर पूर्वच्या खेळाडूंना सावरण्यास संधीच मिळाली नाही. मुंबई उपनगर पूर्वच्या आकाश रुदले याने काहीसा प्रतिकार केला. तर शिवांश गुप्ता याने पकडी घेतल्या.

महिला विभागातील पहिल्या उपांत्य पूर्व फेरीच्या अटितटीच्या झालेल्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने पुणे शहर संघावर २८-२३ असा विजय मिळवित उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघ १०-१३ असा पिछाडीवर होता. मात्र पुणे ग्रामीणच्या अनुभवी प्रशिक्षक असलेल्या राजेश ढमढेरे यांच्या डावपेचांपुढे पुणे शहर संघाला पराभव पत्करावा लागला.

पुणे ग्रामीण संघाच्या मंदिरा कोमकर चढाया व निकिता पडवळ हिने अष्टपैलू कामगिरी केली. त्यांनी अत्यंत सावध चढाया करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. रेखा सावंत हिने उतत्कृष्ठ पकडी घेतल्या. पुणे शहर संघाच्या आम्रपाली गलांडे व अंकिता पिसाळ यांनी जोरदार प्रतिकार केला. मात्र त्यांना आपला पराभव टाळण्यात अपयश आले. सिध्दी मराठे हिने चांगल्या पकडी केल्या.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ १९ जानेवारी रोजी ६ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार व् क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होईल. पारितोषिक वितरण समारंभही सांस्कृत्तिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार असून महाराष्ट्रातील प्रादेशिक नृत्ये व संगीत याची मेजवानी क्रीडा रसिकांना मिळणार आहे. छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या इतिहासामध्ये प्रथमच आयोजन समिती मार्फत रोख पारितोषिक रक्कमेमध्ये भरघोस वाढ करण्यात आलेली असून सदर स्पर्धेमध्ये खेळाडूंना रु.४४.६० लक्षची प्रोत्साहनपर रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विशेष अंमली पदार्थ पथकाची धडक कारवाई



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१८, कल्याण (ठाणे) :** पोलीस उपायुक्त परिमंडल ०३ अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अंमली पदार्थ पथकाने दि१७ रोजी दुर्गाडी सीएनजी पंप सार्वजनिक रोड येथे इसम नाव १) जिशान अक्तर शेख वय २३वर्ष, भिवंडी २) नितीन हिम्मतभाई ओझा वय ५२वर्ष रा. रूम नं ३०२ भिवंडी ३) परवीन फिरोज शेख नवीन वस्ती भिवंडी ईस्ट हे इसम रिक्षामध्ये २१८० ग्रॅम वजनाचा ३२००० रु किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्रीकरिता जवळ बाळगलेला मिळून आले. सदर गुन्ह्याच्या कामी १,०७,०००/- रुपये किमतीची रिक्षा व गांजा हा अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून खडकपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ५८/२५ अमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८(सी), २०(बी), २९प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## कोपरखैरणे विभागातील मुख्य रस्त्यांवर सखोल स्वच्छता मोहीम



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** सखोल स्वच्छतेद्वारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर देत ३० डिसेंबर पासून १३ जानेवारी पर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सुट्टयांसह सलग १५ दिवस सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे हवा गुणवत्तेत सुधारणा झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली राबविल्या जात असलेल्या या स्वच्छता मोहीमांमध्ये प्राधान्याने रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती गोळा करुन त्याठिकाणी प्रक्रियाकृत पाण्याने स्वच्छता करण्यावर भर देण्यात आला. ही मोहीम अशीच पुढे चालू ठेवत कोपरखैरणे विभाग कार्यालय हद्दीत सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या माध्यमातून १६ जानेवारी रोजी सेक्टर २ मुख्य रस्ता तसेच १७ जानेवारी रोजी समतानगर व खैरणे गाव व गावठाण मुख्य रस्ता या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे से.११ कोपरखैरणे येथील मुख्य रस्त्यावरील दुभाजक पाण्याने साफ करुन रंगावरील धूळ धुवून घेण्यात आली. अशाच प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा सर्वच विभागांमध्ये राबविण्यात येत आहेत.

## पुळुज ग्रामपंचायत उपसरपंच पदी रुक्मिणी म्हमाने यांची निवड

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१९, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील येथील पुळुज ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी रुक्मिणी सदाशिव म्हमाने यांची एकमताने निवड करण्यात आली. पुळुज ग्रामपंचायतीची एक वर्षापूर्वी बिनविरोध निवडणूक पार पडली होती. त्यामध्ये खासदार धनंजय महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत बिनविरोध झाली होती. लोकनियुक्त सरपंच पदी विश्वास महाडिक यांची निवड करण्यात आली व उपसरपंच पदी असिफ शेख, यांची निवड करण्यात आली होती. निवड करून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर असिफ शेख, यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर वार शनिवार १८ जानेवारी रोजी पुळुज ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच पदाची निवड प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये रुक्मिणी सदाशिव म्हमाने यांची उपसरपंच पदी एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. माजी उपसरपंच असिफ शेख, यांचा सत्कार करण्यात आला. आणि नूतन उपसरपंच रुक्मिणी सदाशिव म्हमाने यांचा सत्कार विश्वराज महाडिक यांच्या हस्ते करण्यात आला. भीमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक, यांचा ग्रामपंचायत च्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी भीमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक, लोकनियुक्त सरपंच विश्वास (भैया )महाडिक, माजी सरपंच शिवाजी शेंडगे, भारत पाटील, सदाशिव म्हमाने, दत्तात्रय पांढरे, राजू बाबर, नागनाथ वाघमोडे, ग्रामपंचायत सदस्य नयन वाघमोडे, लक्ष्मी सावंत, मोहन गावडे अमोल बाबर, नितीन जाधव, सचिन बाबर, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## धक्कादायक ; बापानेच स्वत:च्या ९ वर्षांच्या मुलाचा केला खून

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१८, बारामती :** अभ्यास करत नसल्याचा राग आल्याने वडिलांनी स्वतःच्या नऊ वर्षांच्या मुलाचा गळा दाबून खून केल्याची हृदयद्रावक घटना बारामती तालुक्यातील होळ येथे घडली आहे. आरोपी वडील विजय गणेश भंडलकर यांनी आपल्या मुलाला भिंतीवर आपटून, त्याचा गळा आवळून जीव घेतल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी पोलिसांनी वडील विजय गणेश भंडलकर,आज्जी शालन गणेश भंडलकर, आणि चुलते संतोष भंडलकर (सर्व रा. होळ, ता. बारामती, जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पियुष ( वय ९ वर्षे) घरात असताना, वडील विजय भंडलकर यांनी त्याला अभ्यासाविषयी खडे बोल सुनावले. तू सारखा बाहेर खेळतोस, तुझ्या आईसारखा वागत आहेस, माझी इज्जत घालवतोस, असे म्हणून त्यांनी रागाच्या भरात पियुषला भिंतीवर आपटले. त्यानंतर गळा दाबून त्याचा खून केला.संतोष भंडलकर यांनी मुलाला प्रथम जगताप हॉस्पिटल होळ येथे नंतर निरा येथील भट्टड डॉक्टरांकडे नेले. तेथेही मुलाचा मृत्यू चक्कर येऊन झाल्याचे सांगण्यात आले. डॉक्टरांनी पियुष मयत झाल्याचे सांगून त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यास सांगितले. मात्र, त्या तिघांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात न जाता पियुषचे प्रेत गावी नेले. मुलाच्या मृत्यूविषयी कोणालाही कळू नये म्हणून पोलीस पाटील किंवा इतरांना माहिती न देता थेट अंत्यविधीची तयारी करण्यात आली. मात्र पोलिसांना गुन्ह्याची माहिती मिळताच पोलिसांनी शिथापीने नातेवाईकांना विश्वासात घेऊन मुलाचे शवविच्छेदन केले त्यात मुलाचा खून केल्याचे उघड झाले या प्रकरणी विजय भंडलकर व त्यांच्या कुटुंबीयांविरोधात खुनाचा आणि पुरावे नष्ट करण्याचा गुन्हा वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात दाखल केला आहे.

# वाढवणा हद्दीत मटक्याची व अवैध दारूची मजबूत झाली मुळे !!

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१८, उदगीर (लातुर) :** नांदेड परिक्षेत्रासाठी पोलीस महानिरीक्षक म्हणून शहाजीराव उमाप रुजू झाल्यानंतर, अवैध धंद्यांना थारा मिळणार नाही. अशा पद्धतीच्या वल्गना मोठ्या प्रमाणात चालू होत्या. मात्र काही भ्रष्ट प्रवृत्तीच्या स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमया मुंडे यांच्या आदर्शवादी विचारांना मूठ माती देत, आपापल्या भागात राजरोसपणे अवैध धंदे चालू केले आहेत. वाढवणा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गुडसुर आणि इतरही ग्रामीण भागामध्ये अवैध दारूचे व मटका,गुटखा, जुगार हे राजरोसपणे चालू असल्याची ओरड सतत केली जात आहे. जास्त ओरड सुरू झाल्यानंतर किंवा वरिष्ठाकडून या अनुषंगाने चौकशी सुरू झाल्यानंतर थातूरमातूर कारवाई करून लपून छपून चालू असलेल्या अवैध धंद्यावर आम्ही धाडी टाकल्या आहेत. अशा पद्धतीचे नाटक रचून अधिकारी आणि जनतेची दिशाभूल करण्यामध्ये काही अधिकारी पटाईत झाले आहेत. वास्तविक पाहता राजरसपणे सर्वसामान्य गोरगरिबांचे संसार उध्वस्त होत आहेत. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात विद्यार्थी आणि सुशिक्षित बेकार मटका, जुगाराकडे आकर्षित होऊ लागले आहेत. मात्र चिरीमिरीच्या नादात पोलीस प्रशासनातील झारीतले शुक्राचार्य या गोष्टीकडे नजर अंदाज करत आहेत. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. अशी चर्चा आता सर्वत्र चालू आहे.

शाळेच्या जवळच अवैध दारू विक्री -वाढवणा (बु.)येथील जिल्हा परिषद प्रशाला, कन्या प्राथमिक शाळा,अंगणवाडी जवळच रस्त्यावर व घरातून अवैध देशी दारू विक्री करण्यात येत आहे.उदगीर तालुक्यातील वाढवणा (बु.) परिसर हा अवैध धंद्याचे माहेरघर म्हणून ओळखले जात आहे .मोठ्या प्रमाणात अवैध दारूची विक्री या भागात होत असते.मात्र मागील काही महिन्यापासून अवैध दारू विक्रेते कोणालाही दाद देत नाहीत. पुर्वी छुप्या पध्दतीने केली जाणारी ही दारू विक्री आता उघड पध्दतीने करण्यात येत आहे.जिल्हा परिषद शाळेजवळ, रस्त्यावर व घरांमधून अवैध दारूची विक्री केली जात आहे.प्रशासनाने याकडे लक्ष देऊन दारू विक्री बंद करावी,अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.विशेष म्हणजे या अवैध दारूच्या व मटक्याला चालना देणारे किंवा यांची मुळे मजबूत करणारे कोण आहेत? हे जग जाहीर आहे. असे असताना देखील मुळावर घाव न घालता केवळ फांद्या छाटून आम्ही फार कर्तबगार आहोत, अशा पद्धतीची बतावणी करण्यामध्ये ही काही जण पटाईत आहेत. मात्र त्या किरकोळ कारवाया अवैध धंदेवाल्यांना पूर्वकल्पना देऊन केली जात असल्याची ही ओरड जनतेतून होऊ लागली आहे. एका बाजूला




अवैध दारूच्या नावाखाली अनेक गोरगरिबांचे संसार उध्वस्त करण्याचा डाव या अवैध धंदेवाल्यांनी रचला असला तरी, कायदा सुव्यवस्थेचा विचार करून पोलीस प्रशासनाने यावर अंकुश ठेवायला हवा. मात्र पोलीस प्रशासनातील काही अधिकारी जणू काही त्या अवैध धंदेवाल्यांचे भागीदार आहेत की काय? अशा पद्धतीने वागत असल्याने इतरही अवैध धंदेवाल्यांना बळ मिळू लागले आहे. अशीही चर्चा सुरू झाली आहे. तर महाराष्ट्र शासनाने कोट्यावधीचा कर बुडाला तरी हरकत नाही, मात्र महाराष्ट्रातील तरुणांचे आरोग्य अबाधित राहावे. असा विचार करून गुटखा आणि सुगंधित तंबाखू वर बंदी घातली. मात्र शासनाचा आणि समाजाच्या हिताचा विचार न करता काही स्वार्थी प्रवृत्तीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अवैध धंद्याला बळ दिल्याची चर्चा आहे.आपल्या देशहिताच्या आणि समाज हिताच्या गोष्टीला बगल देऊन किरकोळ हप्त्याच्या नादात परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या गुटख्याला आणि सुगंधित तंबाखूला हिरवा कंदील दाखवला जातो, कित्येक वेळा तर या पोलीस प्रशासनातील काही लाचखोर प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांमुळेच गुटखा महाराष्ट्रात विशेषतः सीमा भागातून उदगीर, गुडसुर वाढवणा, जळकोट, अहमदपूर या भागात जात असल्याची ही आता खुलेआम चर्चा सुरू झाली आहे. गंमत म्हणजे ही बाब स्थानिकच्या प्रभारी अधिकाऱ्यांना माहित असून देखील ते देखील आपल्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांना आवर घालण्यामध्ये कुठे कमी पडतात? हे कळायला मार्ग नाही. आणि या अवैध दारूच्या गुटख्याच्या आणि मटक्याला हिरवा कंदील दाखवल्यामुळे अवैध दारूवाल्यांचेही आता अच्छे दिन येऊ लागले आहेत. कारण वाढून पोलीस स्टेशनची आता पॉलिसी ठरली आहे हप्ते द्या आणि अवैध दारू विक्री करा असे म्हटले तर नवल वाटू नये. वाढवणा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तर अशा अवैध देशी दारू आणि हातभट्टीच्या दारू नी कहर केला आहे. अवैध धंदे तर चालूच आहेत, त्यात अवैध दारू विक्री चालूच आहे. हे लोकांना माहीत होते, मात्र ते यासंदर्भात जास्त ओरड करत नव्हते. मात्र आता दारू विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची एवढी हिंमत वाढली आहे की, चक्क विद्यार्थ्यांना दिसेल अशा पद्धतीने शालेय परिसराच्या आजूबाजूला राजरोसपणे अवैध दारू विक्री केली जात आहे. आणि गंमत म्हणजे पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर हे सर्व प्रकार होत असताना देखील पोलीस मूग गिळून गप्प का? हा मोठा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडू लागला आहे.

ग्रामीण भागातील काही अवैध देशी दारू आणि हातभट्टीच्या दारूच्या संदर्भात गावकऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारी केल्या होत्या, मात्र दुर्दैवाने पोलीस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनीच त्या अवैध दरू विक्रेत्यांना तक्रारकर्त्यांना नावे सांगितल्यामुळे त्या अवैध दारू विक्रेत्याकडून तक्रारदारांना त्रास दिला गेल्याच्याही घटना घडू लागल्या आहेत. गुडसूर येथील एका अवैध दारू विक्रेत्याने चक्क गुडसूर येथील दै सामना व दै अक्षराज तालुका प्रतिनिधीस माझे नाव का पेपरला दिलास म्हणून मी व माझे दोन मित्र उदगीर वरून गुडसुर कडे घोणसी मार्गे येत असताना त्यांनी आमच्या कारसमोर बुलेट गाडी लावून त्याच्या वडिलाला व दुसऱ्या भावाला बोलून घेऊन माझे नाव का पेपरला दिल्यास म्हणून वाद घातला या अवैध दारू विक्रेत्यांची दादागिरी चालू आहे. त्यामुळे निनावी तक्रारी वाढू लागले आहेत. मात्र तक्रारी निनावी आहेत, अशा गोंडस नावाखाली त्या तक्रारींना कचऱ्याची टोपली दाखवली जाते. आणि परिणामतः त्या तक्रारीची दखलच वरिष्ठाकडे घेतली न गेल्यामुळे सर्रास अवैध दारू विक्री चालू राहते. हे कुठेतरी थांबले पाहिजे. असे सर्वसामान्य माणसांना वाटते. मात्र दुर्दैवाने त्यांच्या वाटण्याला कायदा सुव्यवस्थेच्या दप्तरी काहीच महत्त्व नसल्याने, हे अवैध धंदे बोकाळू लागले आहेत. असे म्हटले तर नवल नाही.वाढवणा गावासह आजूबाजूच्या परिसरातील इतरही मोठ्या गावातून अशाच पद्धतीने अवैध धंदे वाढू लागले आहेत. काही पोलीस प्रशासनाचे हितचिंतक गुटखा, अवैध दारू वाढवणा परिसरामध्ये कुठून आली ? त्या भागातल्या पोलीस अधिकाऱ्यावर अगोदर कारवाई करावी, असाही युक्तिवाद करत आहेत. मात्र ही पळवाट किती दिवस चालणार? एकाने दुसऱ्याकडे बोट करायचे आणि दुसऱ्याने तिसऱ्याकडे! अशा पद्धतीने जर हे चालत राहिले तर समाजाच्या दृष्टीने या अवैध धंद्याच्या विरोधात काय करावे? हा न समजणारा प्रश्न ठरणार आहे. वरिष्ठ पातळीवरून जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या पथकाने वाढवणा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एक रेड टाकली. मात्र स्थानिक पोलीस या बाबीकडे गप्प का? हे देखील न समजणारे कोडे आहे? स्थानिक पोलीस कोणाच्या दबावाखाली आहेत का? की अवैध धंदेवाल्यांच्या ताटाखालचे मांजर बनले आहेत? या संदर्भातही आता खुलेआम चर्चा सुरू झाल्याने वरिष्ठ पातळीवरून दखल घेणे गरजेचे झाले आहे. अशीही चर्चा आता सुरू झाली आहे.

# कर्नवडी ग्रामस्थांच्या पाणी टंचाईबाबत निवेदन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** कर्नवडी ता. खंडाळा ग्रामपंचायत मधील सरपंच, ग्रामसेवक, उपसरपंच, सर्व सदस्य यांचा एकमेकांत ताळमेळ नसलेमुळे ग्रामस्थ्यांची प्रत्येक गोष्टीची गैरसोय होत असलेचे निदर्शनास येत आहे.वेळोवेळी अर्ज करून सुद्धा बॉडी कोणतेही काम मार्गी लावण्यास निष्क्रिय ठरतेय.असे निदर्शनास आल्याने अखिल भारतीय बंजारा युवा सेना जिल्हाध्यक्ष नितीन पवार यांनी खंडाळा तहसीलदार व पंचायत समिती, व पोलीस प्रशासनास शुक्रवार दि. १७ जानेवारी रोजी खंडाळा येथे सहकारी ग्रामस्थांसह निवेदन देत उपोषणाचा इशारा दिला. गेली १ वर्ष बेघर लोकांच्या पाण्याचा वापराण्याचा तर सोडाच पिण्यासाठी दुसऱ्या नळावर जावे लागत



आहे.पाणीपट्टी घरपट्टी माफ करावी. असे या निवेदनात म्हटले आहे. पाण्याची चोरी होते, मोटरी लावल्या जातात या बाबत वारंवार ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार करून देखील पण काही परिवर्तन झाले नसलेने अखेरचा पर्याय उपलब्ध म्हणून प्रशासनाला निवेदन देण्याची वेळ आली आहे. त्यासंभंधीचे पुरावे सुद्धा यावेळी अधिकाऱ्यांना दाखवण्यात आले आहेत. कोणाचाही दबाव नसल्यामुळे ज्याला जे योग्य वाटेल तसें पाण्याची व्यवस्था केली गेली आहे. यावर सदर व्यक्तींनी पाठ फिरवल्याच दिसून येत. पाणी पुरवठा हा २५ जानेवारी २०२५ पर्यंत सुरळीत जेला गेला नाही तर येत्या २६ जानेवारी २०२५ रोजी विविध संघटना चे पदाधिकारी व संबंधित व्यक्ती यांच्यासोबत तहसीलदार कार्यालय खंडाळा या ठिकाणी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडाण्याचा इशारा यावेळी अखिल भारतीय बंजारा युवा सेना जिल्हाध्यक्ष नितीन पवार यांनी दिला आहे. त्यासोबतच ग्रामपंचायत कर्नवडी येथे जल जीवन मिशन अंतर्गत स्कीम सुद्धा राखडत पडलेली आहे या सर्व बाबींची चौकशी झाली पाहिजे असेही या निवेदनात म्हटले आहे.

# जलजीवन योजना भ्रष्टाचाराचे थर्ड पार्टी ऑडिट करा : खा. लंके यांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत झालेल्या पाणी योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत केंद्र सरकारच्या समितीकडे थर्ड पार्टी ऑडीट करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची शुक्रवारी (दि .१४) नवी दिल्लीत भेट घेऊन मागणी केली. तसे पत्राद्वारे केली. पत्रात नमुद करण्यात आले आहे, जनजीवन मिशन योजनेअंतर्गत मंजुर ७९ योजनांपैकी नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील दहा योजना पुर्ण झाल्या आहेत. या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. तशा तक्रारीही आपणाकडे प्राप्त झाल्या आहेत. श्रीगोंदे तालुक्यातील अजनुज, आनंदनगर व अन्य आठ योजनांचे केंद्रीय समिती मार्फत ऑडीट केल्यास या कामांमधील भ्रष्टाचार उघड होणार आहे. मंत्री पाटील यांनी लवकरात लवकर या योजनांचे ऑडीट करावे अशी मागणी खा. लंके यांनी निवेदनात केली आहे.

या योजनेसाठी निकृष्ट दर्जाचे पाईप वापरण्यात आले आहेत. पाईप जमीनीमध्ये एक फुटावर गाडण्यात आले आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊन पाच टक्के योजनांची कामेही दर्जेदार झालेली नाहित. बिले काढण्यासाठी व टक्केवारीसाठी कामे करण्यात येणार असतील तर योजना यशस्वी होणार नसल्याचेही खासदार निलेश लंके यांनी दिशा समितीच्या बैठकीत निदर्शनास आणून दिले होते.

**जिल्हा परिषदेचा प्रतिसाद नाही**

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांच्या कामांचे केंद्रीय समिती मार्फत ऑडीट करण्यासंदर्भात आपण जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे दोन ते तीन वेळा पत्रव्यवहार करण्यात आला, मात्र त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.**- खासदार, नीलेश लंके**

चला, मी भ्रष्टाचार दाखवितो डिसेंबर महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयात



दिशा समितीच्या बैठकीतही खा. लंके यांनी या योजनेतील भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले होते. माझ्यासोबत चला मी भ्रष्टाचार दाखवितो. भ्रष्टाचार नसेल तर मी राजीनामा देतो असे आव्हान खा. लंके यांनी दिले होते.

